ePaper

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 09 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## मुहूर्त ठरला! सकाळी 11 वाजता विजय होणार तामिळनाडूचा CM






पान 3 वरुन...

निगडी मेट्रोसाठी ५० कोटींचा निधी अडकला

### लहान पक्ष ठरणार 'किंगमेकर'; CPM-CPI आणि VCK देणार पाठिंबा

# विजय थलपतीचा मुख्यमंत्रीपदाचा मार्ग मोकळा

**महाईन्यूज । चेन्नई**

**तामिळनाडू विधानसभा निवडणूक २०२६ च्या निकालानंतर रंगलेल्या सत्तासंघर्षाला आता पूर्णविराम मिळण्याची शक्यता आहे. सुपरस्टार विजय यांच्या नेतृत्वाखालील 'तमिळगा वेत्री कझगम' (TVK) हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला असला तरी, बहुमताच्या आकड्यापासून ते काहीसे दूर होते. मात्र, ताज्या सूत्रांनुसार, डावे पक्ष (CPM, CPI) आणि विदुथलाई चिरूथईगल काची (VCK) यांनी विजय यांना पाठिंबा देण्याची तयारी दर्शवल्याने त्यांच्या मुख्यमंत्रीपदाचा मार्ग आता पूर्णपणे मोकळा झाला आहे.**




## तामिळनाडू विधानसभा निवडणूक २०२६ चे अंतिम चित्र :

| | |
|---|---|
| तमिळगा वेत्री कझगम (TVK) : | १०८ |
| द्रविड मुन्नेत्र कळघम (DMK) : | ५९ |
| ऑल इंडिया अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम (AIADMK) : | ४७ |
| भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (INC) : | ५ |
| पट्टाली मक्कल काची (PMK) : | ४ |
| इंडियन युनियन मुस्लिम लीग (IUML) | २ |
| कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (CPI) : | २ |
| विदुथलाई चिरूथईगल काची (VCK) : | २ |
| कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी) : | २ |
| भारतीय जनता पक्ष (BJP) : | १ |
| देसिया मुरपोक्कू द्रविड कळघम (DMDK) : | १ |
| अम्मा मक्कल मुन्नेत्र कळघम (AMMK) : | १ |

## लवकरच अधिकृत घोषणा?

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सीपीएम, सीपीआय आणि व्हीसीके या तिन्ही पक्षांच्या नेत्यांची महत्त्वपूर्ण बैठक सध्या सुरू आहे. या बैठकीत पाठिंब्याच्या अटी आणि पुढील धोरणांवर चर्चा केली जात आहे. ही बैठक संपल्यानंतर लवकरच राज्यपालांची भेट घेऊन सत्तास्थापनेचा दावा केला जाऊ शकतो आणि त्यानंतरच अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे.

## संख्याबळाचे गणित आणि सत्तास्थापना

तामिळनाडू विधानसभेच्या एकूण २३४ जागांपैकी विजय यांच्या टीव्हीके पक्षाने १०८ जागांवर विजय मिळवून दणदणीत कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे, विजय स्वतः दोन मतदारसंघांतून निवडून आले आहेत. नियमानुसार त्यांना एका जागेचा राजीनामा द्यावा लागणार असल्याने त्यांच्या पक्षाचे संख्याबळ १०७ होईल. एकूण आमदारांची संख्या २३३ गृहीत धरली तरी बहुमतासाठी ११८ या जादूई आकड्याची आवश्यकता आहे. टीव्हीकेला सध्या काँग्रेसच्या ५ आमदारांचा पाठिंबा आहे, तरीही बहुमतासाठी आणखी ६ जागांची उणीव भासत होती.

## लहान पक्षांची 'किंगमेकर'ची भूमिका

राज्यातील सत्तापेच सोडवण्यासाठी आता लहान पक्षांनी पुढाकार घेतल्याचे दिसत आहे. निवडणुकीत सीपीएम (CPM), सीपीआय (CPI) आणि व्हीसीके (VCK) या तिन्ही पक्षांनी प्रत्येकी २ जागा जिंकल्या आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, या सहा आमदारांनी विजय यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे.

हा पाठिंबा मिळाल्यास टीव्हीकेप्रणित सरकारकडे आवश्यक असलेले ११८ चे संख्याबळ पूर्ण होणार आहे. यामुळे ५९ जागा जिंकणारा सत्ताधारी डीएमके (DMK) आणि ४७ जागा जिंकणारा एआयडीएमके (AIADMK) या दोन्ही प्रबळ पक्षांना आता विरोधी बाकांवर बसावे लागणार आहे.

# पुण्यात दोन पोलीस हवालदार निलंबित

## ‘कोंबिंग ऑपरेशन’च्या नावाखाली मैत्रिणीसोबत पबमध्ये पार्टी

**महाईन्यूज । पुणे**

**शहरातील सराइतांची चौकशी (कोम्बिंग ऑपरेशन ) सुरू असल्याची पत्नीकडे बतावणी करुन मैत्रिणीसोबत पबमध्ये पार्टी करणाऱ्या पोलीस हवालदाराला निलंबित करण्याचे आदेश पोलीस उपायुक्त डॉ. सागर कवडे यांनी दिले.**



हनुमंत गुलाब कांबळे (रा. पीर वस्ती, खडकी) असे निलंबित केलेल्या पोलीस हवालदाराचे नाव आहे. याबाबत कांबळे याच्या पत्नीने कौटुंबिक छळ केल्याप्रकरणी हडपसर येथील काळेपडळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार कांबळेसह त्याच्या मैत्रिणीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस हवालदारा कांबळे याचे एका तरुणीशी अनैतिक संबंध होते. हे संबंध त्याने पत्नीपासून लपवू न ठेवले होते. त्याने पत्नीला मारहाणही केली होती. घरातून हाकलून देऊन घटस्फोट देण्याची धमकी दिली होती. कांबळे याच्या मैत्रिणीने फिर्यादी पत्नीला मारहाण केली होती, असे पत्नीने फिर्यादीत म्हटले होते.

गेल्या वर्षी १५ जून रोजी कांबळे याला पत्नीने दूरध्वनी केला. तेव्हा रात्रपाळीत कॉम्बिंग ऑपरेशन करण्यात असल्याची बतावणी त्याने पत्नीकडे केली होती. मात्र, कांबळे हा पिंपरी-चिंचवडमधील एका पबमध्ये मैत्रिणीसोबत दारू पित होत होता. पत्नी पबमध्ये गेली. तेव्हा ‘मी पोलीस आहे. तू माझ्याविरुद्ध तक्रार करू शकत नाही’, अशी धमकी त्याने पत्नीला दिली होती. अखेर त्याच्या छळामुळे पत्नीने पोलिसंकडे तक्रार दिली. कांबळे याच्या वर्तनामुळे पोलीस दलाची प्रतिमा मलीन झाली आहे, असा ठपका ठेऊन पोलीस उपायुक्त डॉ. सागर कवडे यांनी त्याला पोलीस दलातून निलंबित केले.

### लाचखोर पोलीस हवालदार निलंबित

वॉरंट न बजाविण्यासाटी एकाकडून दीड लाख रुपयांची लाच घेणाऱ्या कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदारला परिमंडळ पाचच्या पोलीस उपायुक्त राजलक्ष्मी शिवणकर यांनी निलंबिति केले. हैद्राबाद येथील न्यायालयाने धनादेश न वटल्याप्रकरणी एका खासगी कंपनीच्या मालकावारिुद्ध अटक वॉरंट बजाविले होते. हे वॉरंट न बजाविण्यासाठी पोलीस हवालदार गणेश कस्पटे यांनी खासगी कंपनीतील कर्मचाऱ्याकडे दीड लाख रुपयांची लाच मागितील होती. यापूर्वी कस्पटे यांना पाचा लाख रुपये देण्यात आले होते. त्यानंतर त्याने पुन्हा पैशांची मागणी केली. बुधवारी (६ मे) कोरेगाव पार्क भागात तक्रारदाराकडून लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) कस्पटे याला सापळा लावून पकडले. पोलिसांनी त्यांना या प्रकणात अटक केली होती. कस्पटे हे शासकीय कर्मचारी आहेत. त्यांच्या वर्तनामुळे पोलीस दलाची प्रतिमा मलीन झाली आहे, असा ठपका ठेवण्यात आला. कस्पटे यांना पोलीस दलातून निलंबित करण्यात आले.

# अष्टविनायकांपैकी मोरगाव, थेऊर व सिद्धटेक येथील मंदिरे दर्शनासाठी बंद

**महाईन्यूज । पुणे**

**अष्टविनायक विकास आराखड्या अंतर्गत पुरातत्त्व विभागाने अष्टविनायकातील सर्व मंदिरांचे जतन, देखभाल व दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. काम वेगाने पूर्ण होण्यासाठी अष्टविनायकांपैकी श्री क्षेत्र मोरगाव, श्री क्षेत्र थेऊर, श्री क्षेत्र सिद्धटेक येथील गणेश मंदिरे १० मे ते ९ जून २०२६ पर्यंत भाविकांना दर्शनासाठी बंद राहणार आहेत. याबाबतची माहिती चिंचवड देवस्थान ट्रस्टने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.**



पुरातत्त्व विभागामार्फत अष्टविनायकातील सर्व मंदिरांच्या जतन व संवर्धनाची कामे हाती घेण्यात आलेली आहेत. मागील दोन महिन्यांपासून श्री मयुरेश्वर मंदिर, श्री क्षेत्र मोरगाव, श्री चिंतामणी मंदिर, श्री क्षेत्र थेऊर आणि श्री क्षेत्र सिद्धटेक येथे जतन, संवर्धन व दुरुस्तीची कामे सुरू आहेत. सध्या मुख्य मंदिर तसेच मंदिर परिसरातील जतन, दुरुस्ती व संवर्धनाची कामे प्रगतीपथावर आहेत. याच अनुषंगाने मंदिर परिसरात विविध कामे होत असताना, मंदिराचा गणेश मूर्ती असलेला मुख्य गाभारा व त्यापुढील सभामंडप याला पौराणिक काळाप्रमाणेच मूळ सुबक दगडी बांधकाम करुन त्याचे जतन व संवर्धनाचे काम करायचे आहे. हे काम करत असताना गणेश भक्तांचा सतत वावर व त्यांची उपस्थिती याचा कमाला अडथळा निर्माण होईल.

यासाठी पुरातत्त्व विभागाच्या संचालकांनी मंदिराच्या कामासाठी मंदिरे एकाचवेळी बंद करण्यासाठी धर्मादाय आयुक्तांना पत्र दिले होते. पुरातत्त्व विभाग, मंदिर प्रशासन, पुजारी वर्ग, ग्रामस्थ यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर पुरातत्त्व विभागाच्या अंतर्गत चालू असेलेले हे अष्टविनायक मंदिर जतन संवर्धन आणि देखभाल दुरुस्ती काम जलदगतीने पूर्ण व्हावे यासाठी श्री क्षेत्र मोरगांव, श्री क्षेत्र थेऊर, श्री क्षेत्र सिध्दटेक येथील गणेश मंदिरे १० मे ते ९ जून २०२६ पर्यंत पूर्णपणे सर्व भाविकांना दर्शनासाठी बंद राहणार आहे.

### नित्य पूजा सुरू राहणार

- नित्य पूजा सुरू राहणार – मंदिरे दर्शनासाठी बंद असले तरी श्रींची यांची नित्य पूजाअर्चा व इतर धार्मिक विधी नियमानुसार सुरू राहतील.
- थेट दर्शन बंद – या कालावधीत भाविकांना मंदिर परिसरात प्रवेश किंवा प्रत्यक्ष दर्शनाची सुविधा उपलब्ध राहणार नाही.
- प्रवेशावर निर्बंध – मंदीरांचे पुजारी, बांधकाम यंत्रणा, अधिकृत अधिकारी, कर्मचारी व विश्वस्त यांच्याशिवाय अन्य कोणालाही मंदिर परिसरात प्रवेश दिला जाणार नाही. श्री क्षेत्र मोरगाव, श्री क्षेत्र थेऊर व श्री क्षेत्र सिद्धटेक येथील विकासकामे ही दीर्घकालीन सुरक्षितता, सुविधा आणि भाविकांच्या सोयीसाठी अत्यंत आवश्यक आहेत. ही कामे नियोजनबद्ध व वेळेत पूर्ण व्हावीत यासाठी तिन्ही मंदिरे तात्पुरती बंद ठेवण्यात येत आहे. भाविकांनी व स्थानिक नागरिकांनी या कामांचे महत्त्व लक्षात घेऊन मंदिर संस्थान, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन व स्थानिक प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन चिंचवड देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त मंदार महाराज देव यांनी केले आहे

# निगडी मेट्रोसाठी ५० कोटींचा निधी अडकला

## रस्ते दुरुस्तीशिवाय निधी नाही; स्थायी समितीचा ठाम पवित्रा, महामेट्रोसमोर पेच

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**महामेट्रोकडून पिंपरी ते निगडी या विस्तारीत मेट्रो मार्गाचे काम सुरू आहे. त्यात निगडी येथील टिळक चौकात मेट्रोचे अतिरिक्त चौथे स्टेशन उभारण्यात येणार आहे. त्यासाठी लागणारा तसेच, महापालिकेचा हिस्सा असे एकूण 50 कोटी रुपयांच्या निधी अदा करण्याचा प्रस्ताव पालिकेच्या स्थायी समितीने तूर्तास रोखून धरला आहे.**




शहरात मेट्रोच्या कामामुळे खराब झालेल्या रस्त्यांची जोपर्यंत महामेट्रोकडून पूर्णपणे दुरुस्ती होत नाही, तोपर्यंत पालिका तो निधी देणार नाही, अशी ठाम भूमिका स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी घेतल्याने मेट्रोच्या निधीचा पेच निर्माण झाला आहे.

स्थायी समितीची सभा अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि. 6) झाली. केंद्र सरकारने सुरुवातीला पिंपरी ते निगडी या 4.413 किलोमीटर लांबीच्या मेट्रो मार्गिकेसाठी 910 कोटी 18 लाख रुपयांच्या खर्चास मान्यता दिली होती.



मात्र, राज्य शासनाच्या निर्णयानुसार निगडी येथे वाढीव चौथे मेट्रो स्टेशन उभारण्याचे निश्चित झाल्यामुळे या प्रकल्पाचा एकूण खर्च 960 कोटी 18 लाख रुपयांवर पोहोचला आहे. यातील 50 कोटींच्या अतिरिक्त खर्चात राज्य शासन आणि महापालिका प्रत्येकी 25 कोटी रुपयांचा वाटा उचलणार आहे. या खर्चाच्या विषयाला सभेत मंजुरी मिळणे अपेक्षित होते, परंतु मेट्रोच्या कामामुळे होणाऱ्या रस्त्यांच्या दुरवस्थेचा मुद्दा उपस्थित करत अध्यक्ष बारणे यांनी हा प्रस्ताव मंजूर करण्यास नकार दिला. तो प्रस्ताव सलग चार सभेत रोखून धरण्यात येत असून, तो तहकूब केला जात आहे.

### निधीवर अट, नागरिकांना दिलासा

मेट्रो प्रकल्पासाठी महापालिकेचा निधी रोखून धरण्याचा निर्णय हा नागरिकांच्या समस्यांना प्राधान्य देणारा ठरला आहे. मेट्रोच्या कामामुळे रस्त्यांची झालेली दुरवस्था, धुळीचा त्रास आणि वाढते अपघात यामुळे नागरिक त्रस्त आहेत. त्यामुळे आधी रस्ते पूर्ववत करणे हीच प्राथमिकता असल्याचे स्पष्ट करत महापालिकेने निधी वितरणावर अट घातली आहे. यामुळे महामेट्रोवर तातडीने कामे पूर्ण करण्याचा दबाव वाढला आहे.

### निधीच्या वितरणावर टांगती तलवार

या पार्श्वभूमीवर, विकासकामे महत्त्वाची असली तरी सर्वसामान्यांचे हाल आम्ही खपवून घेणार नाही. महामेट्रोने आधी त्यांचे दायित्व ओळखून खराब झालेले रस्ते तातडीने पूर्ववत करावेत. त्यानंतरच महापालिका आपला आर्थिक हिस्सा वर्ग करेल, अशा स्पष्ट शब्दांत अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी महामेट्रो प्रशासनाला सुनावले आहे. महापालिकेने सन 2025-26 च्या अर्थसंकल्पात मेट्रोसाठी 60 कोटींची तरतूद केली असली तरी रस्ते दुरुस्तीच्या अटीमुळे आता या निधीच्या वितरणावर टांगती तलवार निर्माण झाली आहे.

# देहू पालखी मार्गाची दुरवस्था गंभीर: वारकऱ्यांचा प्रवास धोक्यात

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**देहू पालखी मार्गावरील रस्त्यांची दयनीय अवस्था, वाढलेले खड्डे, धुळीचे लोट आणि अपूर्ण नागरी सुविधांमुळे नागरिक व वारकरी बांधवांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचा मुद्दा पुन्हा एकदा समोर आला आहे. या गंभीर परिस्थितीवर तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी शिवसेना नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.**

### वारकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर...

देहू पालखी मार्गावरील खड्डे, धुळीचे लोट आणि अपुऱ्या नागरी सुविधांमुळे नागरिकांसह वारकरी बांधवांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही परिस्थिती अधिक गंभीर बनत असून अपघातांचा धोका वाढला आहे. त्यामुळे तातडीने दर्जेदार रस्ते दुरुस्ती, निचरा व्यवस्था आणि मूलभूत सुविधा पूर्ण करण्याची मागणी जोर धरत आहे.




नगरसेविकेने दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, देहू पालखी मार्ग हा लाखो वारकऱ्यांच्या श्रद्धेचा आणि शहरातील दैनंदिन वाहतुकीचा अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. मात्र सध्या या मार्गाची अवस्था अत्यंत खराब झाली असून, अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहनचालकांना धोका निर्माण होत असून अपघातांची शक्यता वाढली आहे.

विशेषतः पावसाळ्यात रस्त्यावर पाणी साचणे, वाहतूक कोंडी, आणि अपूर्ण निचरा व्यवस्थेमुळे परिस्थिती अधिक गंभीर होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच पदपथ, स्ट्रीट लाईट, स्वच्छता व्यवस्था आणि इतर मूलभूत सुविधा अपुऱ्या असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेविकेने पुढील तात्काळ उपाययोजनांची मागणी केली आहे: रस्त्याचे दर्जेदार डांबरीकरण युद्धपातळीवर करणे, सर्व खड्डे तात्काळ भरणे पावसाळ्यापूर्वी निचरा व्यवस्था सुधारणे, पदपथ व स्ट्रीट लाईटची व्यवस्था पूर्ण करणे, परिसरातील स्वच्छता व सुरक्षिततेच्या उपाययोजना राबवणे.

PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION प्रशासनाने या विषयाची गंभीर दखल घेऊन तात्काळ कार्यवाही करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. वारकरी संप्रदायाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या मार्गाच्या दुरुस्तीला आता वेग देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

> “देहू पालखी मार्ग हा श्रद्धेचा आणि लाखो वारकऱ्यांच्या भावनांचा मार्ग आहे. त्याची सध्याची अवस्था अत्यंत वेदनादायक आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि वारकऱ्यांच्या सन्मानासाठी या रस्त्याचे तात्काळ दर्जेदार डांबरीकरण आणि सर्व मूलभूत सुविधा युद्धपातळीवर पूर्ण होणे अत्यावश्यक आहे. प्रशासनाने याकडे तातडीने गांभीर्याने लक्ष द्यावे.
>
> - ऐश्वर्या तरस, **नगरसेविका, शिवसेना.**



## भूमिका

# महाराष्ट्रातील विरोधकांसमोरचे खरे आव्हान

**पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि केरळमधील अलीकडच्या राजकीय घडामोडींनी देशातील प्रादेशिक पक्षांना मोठा इशारा दिला आहे. अनेक वर्षे अभेद्य वाटणारे पक्ष आणि नेते जनतेने काही क्षणांत बाजूला सारले. याचा अर्थ स्पष्ट आहे — जनतेचा विश्वास कायमस्वरूपी कुणाच्याही नावावर लिहून दिलेला नसतो.**

प्रत्येक निवडणुकीत तो नव्याने मिळवावा लागतो. महाराष्ट्रातील राजकारणाकडे पाहिले तर हीच परिस्थिती अधिक गंभीर स्वरूपात दिसते. राज्यात आज भाजपच्या विरोधात काँग्रेस, उद्धव ठाकरे यांची शिवसेना, शरद पवार यांचा राष्ट्रवादी गट आणि मनसे असे पक्ष उभे आहेत. मात्र या सर्व पक्षांमध्ये आत्मविश्वासापेक्षा संभ्रम अधिक दिसतो. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटींनी प्रादेशिक राजकारणाचा कणा हादरवून टाकला. पक्ष फुटले, चिन्हे बदलली आणि मतदारांच्याही भावना विभागल्या गेल्या. अशा स्थितीत भाजपला थेट टक्कर देण्याइतकी ताकद विरोधकांमध्ये दिसत नाही.

भाजपने गेल्या काही वर्षांत संघटन, प्रचार, नेतृत्व आणि निवडणूक रणनीती यांचा प्रभावी वापर केला. त्याउलट विरोधकांकडे एकत्रित नेतृत्वाचा अभाव आहे. महाराष्ट्रात आज असा एकही नेता दिसत नाही जो स्वतःच्या बळावर संपूर्ण राज्यात जनतेचा विश्वास निर्माण करू शकेल. तामिळनाडूत विजय यांच्यासारखा नवा चेहरा उभा राहतो, बंगालमध्ये ममता बॅनर्जी संघर्षातून नेतृत्व टिकवतात; पण महाराष्ट्रात विरोधकांकडे तसा प्रभावी “थलपती” नाही.

उद्धव ठाकरे पक्षप्रमुख म्हणून सक्रिय असले तरी शिवसेनेतील फूट आणि कमी झालेला प्रभाव त्यांच्यासमोर मोठे आव्हान आहे. शरद पवार यांचे राजकीय कौशल्य मान्य असले तरी वयोमान आणि पक्षातील बदलती परिस्थिती त्यांच्यासाठी अडचणीची ठरत आहे. काँग्रेसची अवस्था तर अधिकच कमकुवत झाली आहे. मित्रपक्षांवर प्रभाव टाकण्याऐवजी काँग्रेसलाच त्यांच्या दबावाखाली काम करावे लागत आहे. मनसेची राजकीय ताकदही पूर्वीसारखी उरलेली नाही.

विरोधकांची आणखी एक मोठी समस्या म्हणजे पराभवाचे खरे आत्मपरीक्षण करण्याची तयारी नसणे. प्रत्येक निवडणुकीनंतर ईव्हीएम, यंत्रणा किंवा कटकारस्थानांवर आरोप करून पराभवाचे कारण शोधले जाते. पण जनतेने पाठ फिरवण्यामागील वास्तव समजून घेण्याचा प्रयत्न कमी दिसतो. केवळ आरोप करून निवडणुका जिंकता येत नाहीत; त्यासाठी लोकांच्या मनात विश्वास निर्माण करावा लागतो.

महाराष्ट्रात प्रादेशिक अस्मिता आणि मराठी प्रश्नांवर राजकारण झाले, पण आज त्या मुद्द्यांची धार कमी झाली आहे. भाजपला रोखायचे असेल तर विरोधकांनी केवळ आघाडी करून चालणार नाही, तर स्पष्ट नेतृत्व, ठोस रणनीती आणि जनतेशी प्रामाणिक संवाद उभा करावा लागेल. अन्यथा आगामी काळात महाराष्ट्रातील साडेतीन पक्षांचे अस्तित्व अधिकच कमकुवत होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

## प्रासंगिक »

### पैलू

**एका देवळात तीन सारखाय मूर्ती होत्या, पण त्यांचे गुण भिन्न होते. एक देव नेहमी सत्य बोले, तो होता सत्यदेव, दुसरा असत्यदेव आणि तिसरा वेळ पाहून सत्य बोले, तो होता संधीसाधू.**

पण त्या तिन्ही देवांचे रूप व आवाज सारखेच असल्यामुळे कोणता देव बोलला हे कळत नसे. एकदा एक गबाळ्या माणसाने मंदिरातल्या साधूला विचारले, "सत्यदेव कोणता? असत्यदेव कोणता? आणि संधीसाधू कोण?

साधुलाही या प्रश्नांची उत्तरे देता आली नाहीत. तो गबाळा माणूस स्वतः गाभाऱ्यात गेला आणि डावीकडच्या देवाला त्याने विचारले, "तुझ्याशेजारी कोणता देव आहे?" देव उत्तरला, "सत्यदेव." त्या माणसाने मधल्या देवाला विचारले, "तू कोणता देव आहेस?" तो म्हणाला संधीसाधू." त्या गबाळ्या माणसाने साधूला सांगितले,"मला सत्यदेव सापडला आणि मी शोधला."

- तात्पर्य : **प्रत्येकाच्या मनातील व्यक्तीत्वात सत्य, असच असत्य आणि संधीसाधुपणा हे पैलू असतात. ते एकमेकांत मिसळुन गेलेले असतात. ज्याचे त्यालाही ते ओळखता येत नाहीत. पण शोधणे आवश्यक असते.**

पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीनंतर पुन्हा एकदा हिंसाचाराने डोके वर काढले आहे. विजय आणि पराभवाच्या राजकारणात सामान्य नागरिकांचे जीवन मात्र भीतीच्या छायेत गेले आहे.

# बंगालच्या राजकारणावरील हिंसाचाराचा काळा डाग



तृणमूल काँग्रेसचा पराभव आणि भाजपचा विजय यानंतर राज्यभर जाळपोळ, तोडफोड, हल्ले आणि हत्या यांच्या घटना घडत आहेत. या हिंसाचारात दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते मृत्युमुखी पडले असून अनेक ठिकाणी तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. लोकशाहीचा उत्सव मानल्या जाणाऱ्या निवडणुका बंगालमध्ये मात्र रक्तरंजित संघर्षाचे रूप घेत आहेत. बंगालमधील हिंसा ही नवी बाब नाही. स्वातंत्र्यानंतर जवळपास प्रत्येक निवडणुकीत राजकीय संघर्ष आणि रक्तपात घडत आला आहे. डाव्या आघाडीच्या काळात विरोधकांना दडपण्यासाठी हिंसेचा वापर झाल्याचे आरोप झाले. त्यानंतर ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसने सत्ता मिळवली, पण परिस्थितीत फारसा बदल झाला नाही. आता भाजप सत्तेत आल्यानंतरही सूडाच्या राजकारणाचीच भीती व्यक्त होत आहे. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, बंगालमध्ये सत्ताबदल झाला तरी राजकीय संस्कृती मात्र बदललेली नाही.

राजकीय पक्ष एकमेकांवर आरोप करत असले तरी हिंसाचारासाठी सर्वच पक्ष काही प्रमाणात जबाबदार आहेत. सत्ता टिकवण्यासाठी किंवा विरोधकांना दबावाखाली ठेवण्यासाठी हिंसेचा वापर करण्याची परंपरा बंगालमध्ये रुजली आहे. त्यामुळे जनतेच्या मनात लोकशाही प्रक्रियेबद्दल असुरक्षितता निर्माण होत आहे. निवडणुकीच्या काळात मोठ्या प्रमाणावर निमलष्करी दल तैनात असूनही हिंसा थांबवण्यात प्रशासन अपयशी ठरले, ही गंभीर बाब आहे.

नव्या सत्ताधाऱ्यांसमोर आता सर्वात मोठे आव्हान म्हणजे कायदा-सुव्यवस्था प्रस्थापित करणे आणि जनतेचा विश्वास परत मिळवणे. विरोधकांवर सूड उगवण्याऐवजी शांतता आणि लोकशाही मूल्यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. राजकीय मतभेद असू शकतात, पण त्यासाठी रक्तपाताचा मार्ग स्वीकारला गेला तर लोकशाही कमकुवत होते. बंगालच्या राजकारणाला लागलेली हिंसेची ही चटक थांबवायची असेल, तर सर्व पक्षांनी आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. निवडणुका जिंकण्यासाठी हिंसा नव्हे, तर जनतेचा विश्वास आणि विकासाचा मार्ग स्वीकारावा लागेल. अन्यथा सत्ताबदल होत राहतील, पण बंगालवरील हिंसाचाराचा काळा डाग कायम राहील.

## ।। अभंगवाणी ।।



राजस सुकुमार मदनाचा पुतळा ।
रविशशिकळा लोपलिया ॥१॥

कस्तुरीमळवट चंदनाची उटी ।
रुळे माळ कंठीं वैजयंती ॥ध्रु.॥ ॥ - संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# दहावीचा निकाल ९७.६२ टक्के

## कोकण विभागाने ९७.६२ टक्के निकालासह राज्यात प्रथम क्रमांक पटकावला

**महाईन्यूज । पुणे**

**कोकण विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने स्थापनेपासून कायम राखलेला राज्यातील अव्वल निकालाचा मान यंदाही अबाधित ठेवला आहे. फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या दहावी परीक्षेत कोकण मंडळाचा एकूण निकाल ९७.६२ टक्के लागला. गतवर्षी मार्च २०२५ मध्ये हा निकाल ९८.८२ टक्के होता. त्यामुळे यंदा निकालात १.२० टक्क्यांनी घट झाली असली, तरी राज्यात कोकण मंडळाने पुन्हा प्रथम क्रमांक पटकावला आहे.**




कोकण विभागातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील ६४० माध्यमिक विद्यालयांमधून ११४ परीक्षा केंद्रांवर एकूण २५ हजार २२६ नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २५ हजार १७२ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले. यांपैकी २४ हजार ५७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून एकूण निकाल ९७.६२ टक्के इतका लागला.

रत्नागिरी जिल्ह्यातील ४१२ माध्यमिक विद्यालयांतील १७ हजार ६१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १७ हजार २१ विद्यार्थी परीक्षेला बसले. त्यातील १६ हजार ५७४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून जिल्ह्याचा निकाल ९७.३७ टक्के लागला. गतवर्षीच्या ९८.५८ टक्क्यांच्या तुलनेत यंदा १.२ टक्क्यांनी घट झाली.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील २२८ विद्यालयांमधून ८ हजार १६५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ८ हजार १५१ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले. त्यांपैकी ७ हजार ९९९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून जिल्ह्याचा निकाल ९८.१३ टक्के लागला. गतवर्षी हा निकाल ९९.३२ टक्के होता.

फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेपासून सर्व परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही यंत्रणा अनिवार्य करण्यात आली होती. कोकण मंडळांतर्गत सर्व ११४ परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करण्यात आल्याने कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्यात आल्याचा दावा मंडळाने केला आहे. यंदाच्या परीक्षाकालावधीत रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत एकही गैरमार्ग प्रकरण नोंदविले गेले नाही. मात्र परीक्षोत्तर चौकशीत चार गैरप्रकार निदर्शनास आले. त्यापैकी दोन विद्यार्थी दोषी आढळल्याने संबंधित विषयांची संपादणूक रद्द करण्यात आली.

पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांमध्ये रत्नागिरी जिल्ह्याचा निकाल ४०.६० टक्के, तर सिंधुदुर्गचा निकाल ३५.१८ टक्के लागला. दोन्ही जिल्ह्यांचा मिळून पुनर्परीक्षार्थ्यांचा एकूण निकाल ३९.०३ टक्के इतका नोंदविण्यात आला.

खाजगी विद्यार्थ्यांमध्ये रत्नागिरी जिल्ह्यात २०२ विद्यार्थ्यांपैकी १५५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून निकाल ७६.७३ टक्के लागला. सिंधुदुर्गमध्ये ८२ विद्यार्थ्यांपैकी ७१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून निकाल ८६.५८ टक्के नोंदविण्यात आला. एकूण २८४ प्रविष्ट विद्यार्थ्यांपैकी २२६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून खाजगी विद्यार्थ्यांचा निकाल ७९.५७ टक्के लागला.

### मुलींची बाजी कायम

कोकण मंडळातील मुलींनी यंदाही निकालात बाजी मारली. १२ हजार २४७ प्रविष्ट मुलींपैकी १२ हजार ७० मुली उत्तीर्ण झाल्या असून त्यांचा निकाल ९८.५५ टक्के लागला. तर १२ हजार ९२५ प्रविष्ट मुलांपैकी १२ हजार ५०३ मुले उत्तीर्ण झाली असून त्यांचा निकाल ९६.७३ टक्के आहे. मुलींचा निकाल मुलांपेक्षा १.८२ टक्क्यांनी अधिक आहे. रत्नागिरी जिल्ह्यात मुलांचा निकाल ९६.५० टक्के, तर मुलींचा ९८.२८ टक्के लागला. सिंधुदुर्गमध्ये मुलांचा निकाल ९७.२० टक्के, तर मुलींचा निकाल ९९.११ टक्के इतका नोंदविण्यात आला.

# कर्जत नगराध्यक्ष रोहिणी घुले यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव

**महाईन्यूज । कर्जत**

**नगरपंचायतच्या नगराध्यक्ष रोहिणी सचिन घुले यांच्या विरोधात १३ नगरसेवकांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना लेखी पत्र देऊन अविश्वास प्रस्ताव दाखल करून त्यांना पदावरून काढून टाकावे, अशी मागणी केली आहे. यामुळे कर्जतमध्ये ( अहिल्यानगर) पुन्हा एकदा राजकीय भूकंप झाला आहे.**



जिल्हाधिकाऱ्यांकडे १३ नगरसेवकांनी नगराध्यक्ष रोहिणी घुले यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे. या प्रस्तावावर गटनेते प्रा. सतीश पाटील, सुवर्णा रवींद्र सुपेकर, उषा अक्षय राऊत, प्रतिभा नंदकिशोर भैलुमे, लंकाबाई देविदास खरात, छाया सुनील शेलार, अश्विनी गजानन दळवी, ताराबाई सुरेश कुलथे, मोनाली ओंकार तोटे, मोहिनी दत्तात्रय पिसाळ, नामदेव चंद्रकांत राऊत, अमृत श्रीधर काळदाते, ज्योती लालासाहेब शेळके यांच्या सह्या आहेत. नगरपंचायतमध्ये एकूण १७ नगरसेवक आहेत.

त्यापैकी १३ जणांनी नगराध्यक्षांना हटवण्याची मागणी केली आहे. नगराध्यक्षांना हटवण्यासाठी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे व त्यांचे परंपरागत विरोधक राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) रोहित पवार यांचे समर्थक नगरसेवक एकत्र आले आहेत.

अविश्वास प्रस्तावामध्ये म्हटले की, नगराध्यक्ष रोहिणी घुले नगरपंचायतचे कामकाज पाहताना कायद्याचे उल्लंघन करत असल्यामुळे त्यांनी विश्वास गमावला आहे, शासनाच्या नियमांचे पालन न करता त्यांच्या स्वतःच्या सोयीनुसार मनमानी पद्धतीने कारभार करतात. नगराध्यक्ष या आमच्या प्रभागातील नागरिकांच्या समस्या सोडवण्याची मागणी केल्यानंतर आम्हास नगरपंचायतीचे कामकाज करताना विश्वासात न घेता, मनमानी पद्धतीने कामकाज करतात.

लोकांच्या सेवेसाठी आवश्यक आरोग्य दिवाबत्ती, शिक्षण, सांडपाणी विल्हेवाट या बाबी नागरिकांच्या सोयीसुविधा तातडीने मिळतील अशी व्यवस्था करण्याची मागणी केल्यास त्या मागणीकडे हेतूपूर्वक दुर्लक्ष करून टाळाटाळ करतात. यामुळे नागरिकांच्या समस्या सुटत नाही. यासह इतरही मुद्दे मांडून अविश्वास प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे दाखल केला आहे.

अविश्वास प्रस्ताव दाखल केल्यामुळे कर्जत तालुक्यात मोठा राजकीय भूकंप झाला आहे. अविश्वास प्रस्ताव मंजूर होणार का याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांची भूमिका यामध्ये निर्णायक राहणार आहे.

दरम्यान नगरपंचायतीमधील राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस पक्षाच्या गटनेते पदी प्रा. सतीश उद्धवराव पाटील यांच्या निवडीस जिल्हाधिकाऱ्यांनी मान्यता दिली आहे. त्यामुळे विद्यमान गटनेते संतोष मेहत्रे यांना मोठा राजकीय धक्का बसला आहे. त्यातून नगरपंचायतीच्या राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे. सतीश पाटील यांनी नगरपंचायतीमध्ये सत्ता परिवर्तन घडवण्यात पुढाकार घेतला होता. काँग्रेस व राष्ट्रवादीच्या नगरसेवकांच्या सभेत गटनेता बदलाचा प्रस्ताव सतीश पाटील यांच्या बाजूने मंजूर करण्यात आला होता व जिल्हाधिकाऱ्यांकडे तो २४ एप्रिलला दाखल करण्यात आला.

# सुवेंदू अधिकारी पश्चिम बंगालचे नवे मुख्यमंत्री

## भाजप विधिमंडळ पक्षाकडून नावावर शिक्कामोर्तब; अमित शाह यांची उपस्थिती

**महाईन्यूज ।**
पश्चिम बंगाल

**पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना दोन वेळा निवडणुकीत पराभूत करणारे सुवेंदू अधिकारी हेच आता नवे मुख्यमंत्री होणार आहेत. पश्चिम बंगाल भाजपाने याची घोषणा शुक्रवारी केली. पश्चिम बंगालच्या सत्ता स्थापनेचा विषय मार्गी लावण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज कोलकाता येथे आले होते. त्यांच्या उपस्थितीत सुवेंदू अधिकारी यांची भाजपाच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आली.**



कोलकाता येथील बिस्वा बांगला कन्व्हेन्शन सेंटरमध्ये भाजपाच्या पश्चिम बंगाल कार्यकारिणी आणि नवनिर्वाचित आमदारांची बैठक पार पडली. या बैठकीला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि प्रदेशाध्यक्ष शमिक भट्टाचार्य उपस्थित होते. या बैठकीत सुवेंदू अधिकारी यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी एकमताने निवड करण्यात आली.

या बैठकीत बोलत असताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले, निवडणुका संपल्या असून पक्षाने मोठा विजय मिळवला आहे. आता सर्वांनी एकच नाव पुढे केले आहे. दुसरे नाव निवडण्यासाठी नेत्यांना वेळ देण्यात आली, मात्र दुसऱ्या कुणाचेही नाव पुढे आले नाही. यामुळे आता सुवेंदू अधिकारी हेच पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री असतील यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

५५ वर्षीय सुवेंदू अधिकारी यांनी २०२१ साली नंदीग्राम विधानसभा मतदारसंघातून ममता बॅनर्जी यांचा पराभव केला होता. त्यानंतर पाच वर्ष त्यांनी विधानसभेचे विरोधी पक्षनेते म्हणून काम केले. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी पुन्हा एकदा भवानीपूर विधानसभा मतदारसंघातून ममता बॅनर्जी यांचा तब्बल १५ हजार मतांनी दणदणीत पराभव केला.

एकेकाळी ममता बॅनर्जी यांचे सहकारी असलेले सुवेंदू अधिकारी २०२० साली भाजपात आले होते. त्यानंतर पुढच्याच वर्षी झालेल्या निवडणुकीत त्यांनी भाजपाचे नेतृत्व करत भाजपाचे पहिल्यांदाच ७७ आमदार निवडून आणण्याची किमया करून दाखवली होती.

### राज्यपालांकडून विधानसभा विसर्जित



विधानसभा निवडणुकीत पराभवाचा धक्का बसल्यानंतर तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्यास नकार दिला होता. निवडणूक निकाल हे जनमताचे प्रत्यंतर नसून, ते निवडणूक आयोगाने भाजपच्या साथीने रचलेले षड्यंत्र असल्याचा आरोप ममतांनी केला होता. अखेर बुधवारी पश्चिम बंगालचे राज्यपाल आर. एन. रवी यांनी विधानसभा विसर्जित केली. त्यानंतर पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसच्या सरकार अधिकृतपणे संपुष्टात आले.

---

# होर्मुझच्या सामुद्रधुनीत अमेरिका-इराणमध्ये पुन्हा चकमक; ३ युद्धनौकांवर हल्ला

**महाईन्यूज । अमेरिका**

**होर्मुझ सामुद्रधुनीत अमेरिका आणि इराण यांच्यात मोठी चकमक झाल्याची माहिती समोर आली आहे. युद्धविरामाला एक महिना पूर्ण होत असताना ही घटना घडली आहे. होर्मुझमधून जाणाऱ्या तीन युद्धनौकांवर गुरुवारी इराणच्या लष्कराने हल्ला केल्याचा आरोप अमेरिकी सेंट्रल कमांडद्वारे करण्यात आला. इराणबरोबर शांतता चर्चा समाधानकारक आणि सकारात्मक पद्धतीने सुरु असल्याचा दावा डोनाल्ड ट्रम्प यांनी केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी घडलेल्या या घटनेमुळे ट्रम्प यांनी चांगलाच संताप व्यक्त केला आहे.**



"त्यांनी (इराण) करारावर स्वाक्षरी न केल्यास भविष्यात आम्ही त्यांच्यावर अतिशय भीषण हल्ले करू, अधिक तीव्र आणि आक्रमक पद्धतीने हल्ले केले जातील", असा इशारा डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. इराणला आण्विक कार्यक्रमासाठी परवानगी दिल्यास ते भविष्यात त्याचा वापर करतील, अशी भीती देखील ट्रम्प यांनी व्यक्त केली. दरम्यान, इराणकडून होर्मुझ सामुद्रधुनीत करण्यात आलेला हल्ला अमेरिकी सैन्याने यशस्वीपणे परतवून लावला. यात युद्धनोकांचे काही नुकसान झाले नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केली.

अमेरिकेने नागरी वस्तीवर हल्ला केल्याचा आरोप इराणकडून करण्यात आला आहे. भूभागावर आणि होर्मुझ सामुद्रधुनीत प्रवेश करणाऱ्या दोन जहाजांवर अमेरिकेने हल्ला केल्याचा आरोप इराणने केला आहे. खबरदारी म्हणून तेहरानने सीमा भागात लष्करी कारवाईचा संशय व्यक्त करत हवाई संरक्षण प्रणाली कार्यान्वित केली आहे. या चकमकीनंतर अमेरिका आणि इराणने युद्ध पुढे वाढविण्याची इच्छा नसल्याचे स्पष्ट केले आहे. या घटनेनंतर सध्या या भागात परिस्थिती सामान्य असल्याचे इराणी माध्यमांनी म्हटले आहे.

### शांतता चर्चेची स्थिती काय?

अमेरिका आणि इराणमध्ये सध्या शांतता चर्चा प्रगती पथावर असल्याचा दावा डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून केला जात आहे. दोन्ही देशातील संघर्षाला कायमाचा पूर्णविराम देऊन, गल्फ प्रदेशात शांतता प्रस्थापित करण्याचा मानस आहे. उभय देशातील शांतता चर्चेचे प्रामुख्याने तीन टप्पे विचाराधीन आहेत. युद्धविराम, होर्मुझ सामुद्रधुनीतील तणावावर कायमस्वरुपी तोडगा काढणे आणि ३० दिवसांच्या शस्त्रसंधीच्या काळात संघर्ष समाप्त करण्यासाठी करार करणे. पण, या करारात वारंवार अडथळे निर्माण होत असून, तोडगा निघण्यास अडचण येत आहे.



# वामिकाला अश्लील प्रश्न?

चित्रपटसृष्टीत अभिनेत्रींशी संवाद साधताना अनेकदा मर्यादा ओलांडल्या जातात, याचा प्रत्यय नुकताच एका कार्यक्रमात आला. आगामी 'पती पत्नी और वो २' या चित्रपटाच्या ट्रेलर लॉन्च सोहळ्यात अँकरने अभिनेत्री वामिका गब्बी हिच्या नावावरून अत्यंत खालच्या पातळीचा विनोद केला. या प्रकाराचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर नेटकऱ्यांनी संबंधित अँकरवर टीकेची झोड उठवली आहे. मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात आयोजित या सोहळ्याला आयुष्मान खुराना, सारा अली खान, रकुल प्रीत सिंह आणि वामिका गब्बी उपस्थित होते. यावेळी अँकरने वामिकाला उद्देशून विचारले की, "तुझ्या जन्मात मीका पाजींचे (गायक मीका सिंग) काय योगदान होते? कारण तुझे नाव ज्याने ठेवले त्याने म्हटले असेल – 'वाह-मीका' (वामिका). काहीतरी सूर तर मीका पाजींनी लावले असतील." हा प्रश्न ऐकून वामिका अत्यंत असहज झाली. तिने केवळ एक औपचारिक हास्य दिले, परंतु तिच्या चेहऱ्यावरील नाराजी स्पष्टपणे दिसून येत होती. याच कार्यक्रमात अँकरने दुसरा एक अश्लील विनोद केला. पापाराझींचा संदर्भ देत तो म्हणाला, "सेलिब्रिटींचे मागील बाजूने फोटो काढून लोक ओळखायला सांगतात. मी खोटे बोलत नाही, मी सर्व सेलिब्रिटींना मागून ओळखतो. समोरून ओळखेनि की नाही माहीत नाही." हे ऐकून अभिनेत्री सारा अली खाननेही संताप व्यक्त करत, "हा काय बोलतोय?" अशी प्रतिक्रिया दिली. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यावर नेटकऱ्यांनी "हा विनोद नसून सार्वजनिक ठिकाणी केलेला अपमान आहे," अशा प्रतिक्रिया दिल्या आहेत. एखाद्या अभिनेत्रीच्या नावाचा आणि जन्माचा असा चुकीचा संदर्भ देणे कितपत योग्य आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे. 'पती पत्नी और वो २' हा चित्रपट २०१९ मध्ये आलेल्या चित्रपटाचा पुढचा भाग आहे. यात आयुष्मान खुराना पुन्हा एकदा 'प्रजापती पांडे'च्या भूमिकेत दिसणार आहे. हा चित्रपट १५ मे २०२६ रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे. मात्र, सध्या चित्रपटाच्या कथानकापेक्षा या वादग्रस्त सोहळ्याचीच चर्चा जास्त होत आहे.



# वादानंतर नोरा फतेहीची माफी



नोरा फतेही सध्या 'सरके चुनर' गाण्यामुळे चर्चेत आहे. कन्नड चित्रपट 'केडी द डेविल'मधील या गाण्यावर सोशल मीडियावर मोठा वाद निर्माण झाला होता. या प्रकरणी राष्ट्रीय महिला आयोगाने नोटीस बजावल्यानंतर नोरा फतेही आयोगासमोर हजर झाली. यावेळी तिने सार्वजनिकरित्या माफी मागितली आणि कोणाच्याही भावना दुखावण्याचा हेतू नसल्याचे स्पष्ट केले. महिला आयोगाबाहेर माध्यमांशी बोलताना नोरा म्हणाली की, "माझा उद्देश कोणत्याही व्यक्तीच्या किंवा समाजाच्या भावना दुखावण्याचा नव्हता." एक कलाकार म्हणून आपली जबाबदारी अधिक चांगल्या प्रकारे समजून घ्यायला हवी होती, अशी कबुलीही तिने दिली. "माझ्याकडून झालेल्या गोष्टीबद्दल मी मनापासून माफी मागते," असेही ती म्हणाली. नोरा फतेहीने सांगितले की, महिला आयोगाच्या सदस्यांनी तिची बाजू शांतपणे आणि संवेदनशीलतेने ऐकून घेतली. आयोगासोबतची चर्चा सकारात्मक वातावरणात झाली आणि सर्व आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्याचे तिने सांगितले. या संपूर्ण वादातून आपण एक मोठा धडा घेतल्याचेही नोरा म्हणाली. या घटनेनंतर समाजासाठी काही चांगले करण्याचा निर्णय घेतल्याचे नोरा फतेहीने जाहीर केले. तिने काही अनाथ मुलींच्या शिक्षणाचा खर्च उचलण्याची जबाबदारी घेतली आहे. तिच्या मते, हा निर्णय तिच्यासाठी खूप भावनिक आणि जबाबदारीचा भाग आहे. केवळ मनोरंजन क्षेत्रापुरते मर्यादित न राहता समाजात सकारात्मक योगदान द्यायचे असल्याचे तिने सांगितले. 'सरके चुनर' हे गाणे रिलीज झाल्यानंतर सोशल मीडियावर अनेकांनी त्यावर टीका केली होती. काही लोकांनी या गाण्यात महिलांचे चुकीचे चित्रण करण्यात आल्याचा आरोप केला. तसेच अशा प्रकारच्या गाण्यांमुळे अश्लीलतेला प्रोत्साहन मिळत असल्याचेही म्हटले गेले. वाद वाढल्यानंतर राष्ट्रीय महिला आयोगाने या प्रकरणाची दखल घेत नोरा फतेहीला स्पष्टीकरण देण्यासाठी बोलावले होते. याआधी या प्रकरणात संजय दत्त यांनाही महिला आयोगासमोर हजर राहावे लागले होते. त्यांनीदेखील माफी मागत 50 आदिवासी मुलींच्या शिक्षणाचा खर्च उचलण्याची घोषणा केली होती. सध्या नोरा फतेहीची माफी आणि अनाथ मुलींसाठी घेतलेला निर्णय सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला आहे. अनेकांनी तिच्या या निर्णयाचे स्वागत केले असून समाजासाठी सकारात्मक पाऊल असल्याचे म्हटले आहे.

# क्रिकेटपटू अमनप्रीत गिल कालवश

## पंजाबचा 36 वर्षीय माजी क्रिकेटपटूचे निधन

**महाईन्यूज । मुंबई**

**पंजाबचा माजी क्रिकेटपटू 36 वर्षीय अमनप्रीत सिंग गिलचे निधन झाले. भारताचा फलंदाज विराट कोहली आणि अष्टपैलू रवींद्र जडेजा यांचा गिल हा एक जवळचा सहकारी म्हणून ओळखला जात असे.**



2007 साली 19 वर्षांखालील वयोगटाच्या विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघामध्ये विराट कोहली, रवींद्र जडेजा तसेच मनिष पांडे आणि अमनप्रीत गिल एकत्र खेळले होते. 2007 साली झालेल्या 19 वर्षांखालील वयोगटातील तिरंगी क्रिकेट स्पर्धेत सहभागी झालेल्या भारतीय संघात अमनप्रीत गिलचा समावेश होता. अमनप्रीत गिलने पाच सामन्यांत 9 गडी बाद केले होते. तसेच त्याने 6 प्रथम श्रेणी सामन्यात एकूण 11 बळी मिळविले होते. माजी क्रिकेटपटू युवराज सिंग तसेच अन्य काही भारतीय क्रिकेटपटूंनी त्याचप्रमाणे पंजाब क्रिकेट संघटनेने अमनप्रीत सिंग गिलला श्रद्धांजली वाहिली.

अमनप्रीत गिलच्या निधनामुळे पंजाब क्रिकेट वर्तुळात हळहळ व्यक्त केली जात आहे. युवा क्रिकेटपटूंमध्ये त्याची मेहनती आणि शांत स्वभावाचा खेळाडू म्हणून ओळख होती. वयाच्या अवघ्या 36 व्या वर्षी त्याने जगाचा निरोप घेतल्याने अनेक माजी सहकारी आणि चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. सोशल मीडियावर अनेक क्रिकेटप्रेमींनी त्याच्या आठवणींना उजाळा देत श्रद्धांजली अर्पण केली. भारतीय क्रिकेटमधील त्याचे योगदान आणि सहकाऱ्यांसोबतचे मैत्रीपूर्ण नाते कायम स्मरणात राहील.



# IPL मध्ये खळबळ! स्टार खेळाडूच्या गर्लफ्रेंडकडून टीमची माहिती लीक?

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**IPL 2026 चा हंगाम रंगात आला असतानाच आता मैदानाबाहेरील एका नव्या वादाने क्रिकेटविश्वात खळबळ उडाली आहे. एका स्टार क्रिकेटपटूच्या गर्लफ्रेंडने संघाशी संबंधित गोपनीय माहिती बाहेरच्या लोकांना लीक केल्याचा दावा समोर आला आहे. या प्रकरणानंतर BCCI ने तातडीने सर्व फ्रेंचायझींना कठोर मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.**



BCCI ने 7 मे रोजी IPL मधील सर्व 10 फ्रेंचायझींना तब्बल 8 पानी गाइडलाइन्स पाठवल्या आहेत. यात सुरक्षा नियम, प्रोटोकॉल आणि खेळाडूंच्या खासगी हालचालींबाबत कडक निर्बंध लावण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, खेळाडू, सपोर्ट स्टाफ किंवा टीम मालकांच्या पाहुण्यांना आता लिखित परवानगीशिवाय टीम हॉटेलमधील खोल्यांमध्ये प्रवेश मिळणार नाही.

या अचानक घेतलेल्या निर्णयामागे नेमकं काय कारण आहे, याबाबत मोठी चर्चा सुरू झाली होती. त्यानंतर एका मीडिया रिपोर्टमध्ये धक्कादायक दावा करण्यात आला. IPL मध्ये खेळणाऱ्या एका क्रिकेटपटूची गर्लफ्रेंड दोन वेळा संघातील गोपनीय माहिती बाहेरील लोकांपर्यंत पोहोचवत असल्याचे कथितरित्या आढळून आले. ही बाब संबंधित फ्रेंचायझीच्या लक्षात आल्यानंतर तातडीने BCCI ला माहिती देण्यात आली.

यामुळेच BCCI आता पूर्णपणे सतर्क झाली आहे. बोर्डाच्या अँटी करप्शन युनिटलाही काही प्रोटोकॉल उल्लंघनाच्या तक्रारी मिळाल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे खेळाडूंच्या सुरक्षेसोबतच त्यांच्या संपर्कात येणाऱ्या लोकांवरही लक्ष ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

नव्या गाइडलाइनमध्ये 'हनी-ट्रॅप'सारख्या धोक्यांबाबतही स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. खेळाडूंना अशा प्रकारच्या जाळ्यात अडकू न देण्यासाठी फ्रेंचायझींना सांगण्यात आले आहे. विशेषतः सोशल सर्कल, पार्टनर, मित्र किंवा बाहेरील व्यक्तींमार्फत संघातील रणनीती, प्लेइंग इलेव्हन किंवा ड्रेसिंग रूममधील चर्चा बाहेर जाणार नाहीत, यावर भर देण्यात आला आहे. IPL सारख्या अब्जावधींच्या लीगमध्ये बेटिंग, स्पॉट फिक्सिंग आणि माहिती लीक होण्याचा धोका कायम असतो. त्यामुळे BCCI यावेळी कोणतीही जोखीम घेण्याच्या मनस्थितीत नाही. आता पुढील काही दिवसांत या प्रकरणात आणखी कोणती नावे समोर येतात का, याकडे क्रिकेट चाहत्यांचे लक्ष लागले आहे.

## 'हनी ट्रॅपिंग'चा धोका

सर्व फ्रँचायझींना 'हनी ट्रॅपिंग'च्या धोक्यांपासून सावध राहण्याचा इशाराही देण्यात आला आहे, जे धोके अशा हाय-प्रोफाइल स्पर्धांदरम्यान वारंवार आढळून येतात. लैंगिक छळाशी संबंधित भारतीय कायद्यांनुसार गंभीर कायदेशीर आरोपांचा समावेश असलेल्या घटनांची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे, फ्रँचायझींनी नेहमी सतर्क राहिले पाहिजे आणि असे धोके कमी करण्यासाठी सक्रिय पावले उचलली पाहिजेत. कोणत्याही प्रकारचा गोंधळ टाळण्यासाठी खेळाडू, सहाय्यक कर्मचारी, संघाचे मालक आणि अधिकारी यांना हॉटेल आणि स्टेडियममध्ये सर्वकाळ त्यांचे अधिस्वीकृती कार्ड परिधान करावे लागेल. तसेच, संघाच्या मालकांना आणि अधिकाऱ्यांना सामन्यादरम्यान कोणत्याही परिस्थितीत, मग ते डगआउटमध्ये असो किंवा संघाच्या ड्रेसिंग रूममध्ये, खेळाडू आणि सपोर्ट स्टाफला भेटण्याची, त्यांच्याशी बोलण्याची किंवा त्यांना कोणत्याही सूचना देण्याची परवानगी दिली जाणार नाही.

स्मार्ट PCMC
SMART CITY
epaper.mahaenews.com
महाईन्यूज™
ePaper
। शनिवार ।
दि. 09 मे 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# घरगुती गॅसची उघड लूट; नियमांना हरताळ

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**पिंपळे गुरव परिसरात खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या स्टॉलधारकांकडून घरगुती गॅस सिलिंडरचा वापर होत असल्याचे 'दैनिक पुढारी'च्या प्रतिनिधीने केलेल्या पाहणीत समोर आले आहे.**

घरगुती वापराच्या सिलिंडरचा व्यावसायिक वापर करता येत नाही. परंतु पिंपळे गुरव व इतर ठिकाणी नियमांची पायमल्ली करत घरगुती सिलिंडर वापरला जात आहे. याकडे संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांनी प्रशासनाच्या कामाविषयी शंका उपस्थित केली आहे.


शासनाच्या नियमानुसार घरगुती गॅसचा वापर व्यवसायासाठी करणे बेकायदेशीर आहे. उद्योगधंदा व हॉटेल व्यवसायासाठी कमर्शियल सिलिंडरची व्यवस्था केली आहे. मात्र, खर्च वाचवण्याच्या नादात वडापाव, इडली, उडीद वडा, चहाची टपरी तसेच इतर खाद्यपदार्थांच्या हातगाड्यांवर मोठ्या प्रमाणात घरगुती गॅस सिलिंडरचा वापर सुरू असल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे. इराण आणि इस्राईल, अमेरिका युद्ध सुरू असल्याने घरगुती गॅस सिलिंडर अद्याप वेळेत मिळत नाही. दररोज गॅस एजन्सीच्या दारात शेकडो नागरिक गॅसची टाकी घेऊन उभा राहत आहेत. त्यांच्यात गॅससाठी वाद होताना दिसून येत आहेत. ऑनलाईन गॅस बुकिंग केल्यानंतर कित्येक दिवस नागरिकांना गॅस मिळत नाही. परंतु व्यावसायिकांना दररोज गॅस कुठून उपलब्ध होतो, हा मोठा प्रश्न आहे.

> “घरगुती गॅसचा गैरवापर आढळल्यास आमचे पथक तात्काळ कारवाई करत आहे. कोणीही घरगुती गॅसचा वापर व्यवसायासाठी करत असेल तर कृपया आमच्या संपर्क क्रमांक चिंचवड विधानसभा 9765581818, पिंपरी विधानसभा 7843033473, भोसरी विधानसभा 9850064849 या क्रमांकावर आम्हाला कळवा. आम्ही संबंधितांवर योग्य ती कारवाई करू.
>
> **- विजयकुमार क्षीरसागर, अन्नधान्य पुरवठा अधिकारी, निगडी कार्यालय.**



D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026



*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*

**UG/PG Programs**
- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp

2025 Excellence in Chemical Engineering for a Sustainable Future
2025 Bright Blue Print in Civil Engineering Education
2025 Creative Excellence in Film Studies & Media Research
2024 Excellence in Digital Disruption
2024 Most Promising Engineering University in India
2024 Game Changer in Bioengineering Education
2024 Trailblazer in Semiconductor Engineering

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# वायसीएम रुग्णालयातील मूलभूत सुविधांचा प्रश्न ऐरणीवर!

## भारतीय जनता पार्टीच्या नगरसेविका योगिता नागरगोजे यांचे आयुक्तांना निवेदन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात (वायसीएम) रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना भेडसावणाऱ्या मूलभूत सुविधांच्या गंभीर प्रश्नांकडे नगरसेविका तथा स्थायी समिती सदस्या सौ. योगिता ज्ञानेश्वर नागरगोजे यांनी महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. यासंदर्भात त्यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.**



वायसीएम रुग्णालयात पिंपरी-चिंचवड शहरासह पुणे जिल्हा आणि राज्यातील विविध भागांतून मोठ्या प्रमाणावर रुग्ण उपचारासाठी येत असतात. शहरातील प्रमुख महापालिका रुग्णालय म्हणून दिवसेंदिवस रुग्णसंख्या वाढत असताना आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे नागरगोजे यांनी निवेदनात म्हटले आहे.

रुग्णालय परिसरात मोबाईल नेटवर्क अत्यंत कमी प्रमाणात उपलब्ध असल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना संपर्क साधणे कठीण होत आहे. आपत्कालीन परिस्थितीत संवाद साधता न आल्याने मानसिक तणाव वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे सर्व मोबाईल सेवा प्रदात्यांचे नेटवर्क सुरळीत उपलब्ध करून देण्याबरोबरच हाय-स्पीड वाय-फाय सुविधा सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### मोशीतील ८५० बेडचे रुग्णालय लवकर पूर्ण करण्याची मागणी

पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवरील वाढता ताण लक्षात घेता मोशी येथे उभारण्यात येत असलेल्या सुमारे ८५० बेड क्षमतेच्या अत्याधुनिक मल्टीस्पेशालिटी महापालिका रुग्णालयाचे काम तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता असल्याचे नागरगोजे यांनी म्हटले आहे. आमदार महेशदादा लांडगे यांच्या संकल्पनेतून साकारत असलेले हे रुग्णालय लवकर कार्यान्वित झाल्यास शहरातील आरोग्य व्यवस्थेवरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याबाबत संबंधित विभागांना तातडीने कार्यवाहीचे निर्देश देऊन नागरिकांना दर्जेदार आणि सुलभ आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी नगरसेविका योगिता नागरगोजे यांनी केली आहे.

### डिजिटल पेमेंटची सुविधा आवश्यक

रुग्णालयातील कॅश काउंटरवर केवळ रोख व्यवहार स्वीकारले जात असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी उपचारासाठी आलेल्या रुग्णांना अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे सर्व कॅश काउंटरवर यूपीआय, डेबिट-क्रेडिट कार्ड आणि QR कोडद्वारे डिजिटल पेमेंट सुविधा तातडीने सुरू कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

### २४ तास झेरॉक्स व मोबाईल चार्जिंग सुविधा

उपचार प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रांच्या झेरॉक्ससाठी रुग्णांच्या नातेवाईकांना रुग्णालयाबाहेर जावे लागते. रात्रीच्या वेळी ही समस्या अधिक गंभीर बनते. त्यामुळे रुग्णालय परिसरात २४ तास झेरॉक्स सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच दीर्घकाळ रुग्णालयात थांबणाऱ्या नातेवाईकांसाठी सुरक्षित मोबाईल चार्जिंग पॉईंट्स उभारण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

## नवोन्मेष व तांत्रिक कौशल्यासाठी युवकांची भूमिका महत्त्वाची : डॉ. राजेंद्र हिरेमठ

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**युवकांमध्ये नवोन्मेष, तांत्रिक कौशल्य, स्टार्टअप, वित्तीय नियोजन आणि उद्योजकता विकसित करण्यासाठी टेक्नोव्हेटसारख्या तांत्रिक स्पर्धांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन करिअर समुपदेशक तथा सिनर्जी व्हॅल्युअर्स अँड प्रोजेक्ट कन्सल्टंट प्रा. लि.चे संचालक डॉ. राजेंद्र हिरेमठ यांनी केले. विद्यार्थ्यांनी ग्रामीण विकास, संशोधन आणि उद्योजकतेच्या माध्यमातून देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च (पीसीसीओइआर) येथे वार्षिक तांत्रिक महोत्सवानिमित्त "टेक्नोव्हेट २०२६" या तांत्रिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत महाराष्ट्रासह देशभरातील ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विजेत्या संघांना एकूण दोन लाख रुपयांची बक्षिसे आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमास पीसीसीओइआरचे संचालक तथा प्राचार्य डॉ. हरीश तिवारी, सावी इन्फ्रास्ट्रक्चरचे संचालक डॉ. विकास पाटील, संशोधन विभाग प्रमुख डॉ. सुदर्शन बोबडे आदी उपस्थित होते.

डॉ. विकास पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सध्याच्या तांत्रिक ज्ञानाबरोबरच व्यावहारिक कौशल्य, उद्योग क्षेत्रातील गरजा आणि करिअरच्या नव्या संधींबाबत जागरूक राहण्याची आवश्यकता व्यक्त केली.

प्रास्ताविकात डॉ. हरीश तिवारी यांनी सांगितले की, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना स्वतःची गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळते. संस्थेमध्ये तांत्रिक वातावरण, संशोधन संस्कृती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत.

डॉ. सुदर्शन बोबडे यांनी विद्यार्थ्यांनी नवोन्मेष आणि पेटंट्सच्या माध्यमातून जागतिक स्तरावर स्वतंत्र ओळख निर्माण करण्याचे आवाहन केले. तसेच प्रकल्प सादरीकरण, स्टार्टअप्स आणि इंडस्ट्री-ओरिएंटेड शिक्षणाकडे अधिक लक्ष देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या आयोजनात डॉ. दिपाली ढाके, प्रा. अक्षय राहणे, विद्यार्थी समन्वयक कुशल बोरसे आणि श्रेया रेवडे यांनी सहभाग घेतला.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर आणि कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. स्वागत डॉ. सुदर्शन बोबडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. अक्षय राहणे यांनी मानले.

### प्रथम क्रमांक

- थ्री डी प्रिंटिंग डिझाइन स्पर्धा : अनुप कुलकर्णी व करण मेंदाद (पीसीसीओइआर)
- स्ट्रक्टोमॅनिया स्पर्धा : हर्ष कुंभार व टीम (पीसीसीओइआर, रावेत)
- बीजीएमआय स्पर्धा : प्रशांत शर्मा (एस. बी. पाटील कॉलेज, रावेत)
- आयपीएल ऑक्शन स्पर्धा : साई गोळेकर व टीम (सीएसके)
- प्रॉम्प्ट बॅटल स्पर्धा : विनय वानखेडे, चेतन यादव, प्रणव तुसे, संकल्प तुसे (टीम ब्रेन हॅकर्स, पीसीसीओइआर)
- शार्क टँक स्पर्धा : सृष्टी काकड, अथर्व दरपुडे, आर्यन सुर्वे (टीम महावायू इनोवेशन, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, आकुर्डी)

# आधी सुविधा द्या; मगच कररचनेत बदल करा!

## महापालिका पदाधिकाऱ्यांची सूचना : सर्वसाधारण सभेतील गोंधळानंतर आढावा बैठक

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन विभागाची महत्त्वपूर्ण बैठक आज महापौर रवी लांडगे यांच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीत नव्याने समाविष्ट झालेल्या भागांतील कररचनेच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली. यावेळी शहरातील लोकप्रतिनिधींनी नागरिकांच्या हिताची ठाम भूमिका मांडत, "आधी सुविधा द्या, मगच कररचनेत बदल करा" असा स्पष्ट संदेश प्रशासनाला दिला.**



बैठकीत महापौर रवि लांडगे, भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे, सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, नगरसेवक राहुल कलाटे आणि सचिन तापकीर यांच्यासह महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### नव्याने समाविष्ट भागांतील कररचनेवर आक्षेप

वाकड, ताथवडे, पुनावळे, थेरगाव, चिखली, चऱ्होलीसह नव्याने महापालिकेत समाविष्ट झालेल्या गावांमध्ये नवीन कर विभागणी पद्धतीमुळे सदनिका आणि व्यावसायिक मालमत्तांवर मोठ्या प्रमाणात करवाढ होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. लोकप्रतिनिधींनी बैठकीत स्पष्टपणे नमूद केले की, अपुऱ्या नागरी सुविधा असताना नागरिकांवर अतिरिक्त करभार लादणे योग्य नाही. त्यामुळे प्रस्तावित कररचनेचा पुनर्विचार करण्याची मागणी करण्यात आली.

### तज्ज्ञ समिती आणि स्पष्टतेची मागणी

बैठकीत पुढे मोकळ्या जागांवरील कर, तसेच इतर कर रचनेबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच कोणतीही नवीन करपद्धती लागू करण्यापूर्वी तज्ज्ञ समिती नेमून सखोल अभ्यास करूनच निर्णय घ्यावा, असे मतही ठामपणे व्यक्त करण्यात आले.

### नागरिकांच्या हितासाठी दबाव कायम

या बैठकीतून स्पष्ट झाले की, स्थानिक लोकप्रतिनिधी नागरिकांवरील करभार वाढू नये यासाठी एकत्रितपणे भूमिका घेत आहेत. शहराच्या विकासासोबतच सुविधा आणि न्याय्य कररचना यांचा समतोल राखण्यावर भर देण्यात आला आहे.

---

# एम. एस. एस. हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचा उज्वल निकालाची परंपरा कायम

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**


**चिंचवड येथील मोरया शिक्षण संस्थेच्या एम. एस. एस. हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावी व बारावी परीक्षा २०२५-२६ मध्ये यंदाही उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाने सर्व शाखांमध्ये 100 टक्के निकालाची नोंद करत शैक्षणिक उत्कृष्टतेचा ठसा उमटवला आहे.**




इयत्ता दहावी परीक्षेसाठी एकूण 188 विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होत शाळेने 100 टक्के निकाल प्राप्त केला आहे. यामध्ये 90 टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या 23 विद्यार्थ्यांचा समावेश आहे. दहावी परीक्षेत कु. कस्तुरी कुलकर्णी हिने 99 टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कु. कस्तुरी गायकवाड हिने 97.20 टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक, तर कु. वरदा टिकोळे हिने 97 टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला.

इयत्ता बारावी परीक्षेत विज्ञान, कला व वाणिज्य शाखेतून एकूण 134 विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी 40 विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले. विज्ञान शाखेचा 100 टक्के, वाणिज्य शाखेचा 97.91 टक्के तर कला शाखेचा 91.66 टक्के निकाल लागला आहे.

बारावी विज्ञान शाखेत कुमार अथर्व कुदळे याने 86.67 टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक, कु. भक्ती गव्हाणे हिने 85.33 टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक, तर कुमार अर्घ्य पाठक याने 84.83 टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. वाणिज्य शाखेत कुमार रोहन राजभर (79.33 टक्के) प्रथम, कु. हर्षिता घाडगे (77.83 टक्के) द्वितीय, तर कु. श्रेयश जकापुरे व




अमेय कुलकर्णी (74.50 टक्के) यांनी संयुक्तरीत्या तृतीय क्रमांक मिळवला. कला शाखेत कु. हिरण्या मंडुसकर हिने 83.33 टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. विद्यालयातून विज्ञान शाखेत 75, वाणिज्य शाखेत 47 तर कला शाखेत 12 विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.

### यशस्वी विद्यार्थ्यांचा होणार गौरव..!

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. स्वप्निल शेडगे, कार्यवाह तथा प्राचार्या सौ. इंद्रायणी माटे पिसोळकर आणि खजिनदार तथा तहहयात विश्वस्त श्री. रणजीत सावंत यांनी विद्यार्थ्यांचे, पालकांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले. सातत्यपूर्ण मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळे हे यश मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. शिक्षकांनी घेतलेल्या जादा तासिका, सराव परीक्षा, वैयक्तिक मार्गदर्शन व नियमित मूल्यमापन यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून उत्तम निकाल साध्य झाल्याचेही संस्थेतर्फे सांगण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ लवकरच आयोजित करण्यात येणार असून सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# 'पीसीसीओई'मध्ये 'के-नेस्ट कन्स्ट्रक्शन टेक सेंटर ऑफ एक्सलन्स'ची स्थापना

## शिक्षण विश्व: उद्योग-शिक्षण दुवा अधिक मजबूत होणार!




महाईन्यूज ।
पिंपरी- चिंचवड

**पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय (पीसीसीओई) येथे 'के-नेस्ट कन्स्ट्रक्शन टेक सेंटर ऑफ एक्सलन्स' या नव्या सेलची स्थापना करण्यात येणार आहे. यासाठी पीसीसीओई आणि के. नेस्ट कन्स्ट्रक्शन टेक, पुणे यांच्यात सामंजस्य करार (MOU) करण्यात आला.**

या करारावर पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी आणि के. नेस्ट कन्स्ट्रक्शन टेकचे संस्थापक व संचालक प्रशांत अग्रवाल यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पंकज श्रीवास्तव, स्थापत्य अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. अजय गायकवाड, संशोधन व विकास विभागाचे अधिष्ठाता डॉ. नरेंद्र देवरे, डॉ. धीरजकुमार लाल, डॉ. विनय रंगारी आदी उपस्थित होते.

के. नेस्ट कन्स्ट्रक्शन टेक ही कंपनी थ्रीडी प्रिंटिंग तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जलद, मजबूत आणि किफायतशीर बांधकाम उपायांमध्ये आघाडीवर आहे. प्रीकास्ट आणि मॉड्युलर बांधकाम पद्धती, पर्यावरणपूरक व शाश्वत बांधकाम उपाय तसेच आधुनिक यंत्रणांचा वापर करून बांधकाम क्षेत्रात नवोपक्रम घडविण्यावर कंपनीचा भर आहे.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर तसेच कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी या कराराबद्दल महाविद्यालयाच्या संचालक, प्राध्यापक व समन्वयकांचे अभिनंदन केले आहे.

### अभियांत्रिकी शिक्षणाला नवी दिशा

या केंद्राच्या स्थापनेमुळे विद्यार्थ्यांना थ्रीडी प्रिंटिंगसह अत्याधुनिक बांधकाम तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष प्रशिक्षण, उद्योगाभिमुख प्रकल्पांमध्ये सहभाग आणि रोजगाराभिमुख कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच प्राध्यापकांना संशोधन व नवोपक्रमासाठी आधुनिक सुविधा मिळणार असून उद्योग व शिक्षण क्षेत्रातील समन्वय अधिक बळकट होणार आहे. पीसीसीओई संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी सांगितले की, या उपक्रमामुळे पिंपरी चिंचवड परिसरातील अभियांत्रिकी शिक्षणाला नवी दिशा मिळणार असून विद्यार्थ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाधारित उज्ज्वल करिअरच्या संधी निर्माण होतील. या उपक्रमाच्या समन्वयक म्हणून डॉ. धीरजकुमार लाल आणि डॉ. विनय रंगारी यांनी काम पाहिले.




# सुरक्षा यंत्रणा म्हणजे 'हजेरी लावा अन् पगार घ्या'

## भाजपा नगरसेविका अर्चना करांडे यांची तातडीच्या कारवाईची मागणी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील सेक्टर २२ परिसरात वाढत्या गुन्हेगारी, नशेखोरी आणि अवैध प्रकारांमुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असताना आता निगडीतील साईनाथनगर आणि यमुनानगर परिसरातही भविष्यात गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या या भागात परिस्थिती नियंत्रणात असली तरी वेळेत योग्य उपाययोजना न केल्यास येथेही गुन्हेगारी, दहशतगिरी आणि अवैध धंद्यांचा सुळसुळाट वाढू शकतो, अशी भीती स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.**



स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, परिसरातील काही मोकळ्या जागा, उद्याने आणि अंधारे भाग येथे रात्रीच्या वेळी संशयास्पद हालचाली वाढताना दिसत आहेत. काही ठिकाणी तरुणांचे टोळके बसत असल्याने महिलांमध्ये, ज्येष्ठ नागरिकांमध्ये आणि पालकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. विशेषतः उद्यान परिसरात मद्यपी आणि अवैध प्रकार करणाऱ्यांचा वावर वाढल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. विशेषत: छत्रपती संभाजी महाराज उद्यान, महाराणा प्रताप उद्यान येथील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

महापालिका प्रशासनाकडून उद्यान आणि सार्वजनिक ठिकाणांच्या सुरक्षेसाठी खासगी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्यात आली असली तरी प्रत्यक्षात अनेक ठिकाणी सुरक्षारक्षक ड्युटीवर उपस्थित नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. काही गार्ड केवळ हजेरी लावून निघून जात असल्याने सुरक्षा व्यवस्थेचा पूर्णपणे बोजवारा उडाल्याचे चित्र दिसत आहे. कोट्यवधी रुपयांचा खर्च करूनही सुरक्षा व्यवस्था प्रभावी नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

### महानगरपालिका प्रशासनाला इशारा

नसरापूर येथे घडलेल्या घटनेचा उल्लेख करत नागरिकांनीही प्रशासनाला इशारा दिला आहे की, "दुर्घटना घडल्यानंतर हालचाल करण्यापेक्षा ती आधीच रोखणे अधिक महत्त्वाचे आहे." त्यामुळे परिसरात नियमित पोलीस गस्त, सीसीटीव्ही यंत्रणा, सुरक्षारक्षकांची उपस्थिती आणि अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्ते अक्षय कारंडे यांनीही प्रशासनाने तात्काळ कारवाई करून सुरक्षारक्षकांची उपस्थिती सुनिश्चित करावी आणि नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे, अशी मागणी केली आहे.

> साईनाथनगर आणि यमुनानगर परिसरात सध्या परिस्थिती नियंत्रणात असली तरी प्रशासनाने वेळेत लक्ष दिले नाही तर येथेही गुन्हेगारी, दहशतगिरी आणि अवैध धंद्यांचा सुळसुळाट वाढू शकतो. महापालिकेकडून सुरक्षेसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च केला जात असतानाही अनेक ठिकाणी सुरक्षारक्षक ड्युटीवर दिसत नाहीत. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कोणतीही दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई करून सुरक्षा व्यवस्था मजबूत करावी, पोलीस गस्त वाढवावी आणि अवैध प्रकारांवर नियंत्रण आणावे.
>
> **- अर्चना करांडे,**
> **नगरसेविका, भाजपा.,**
> **पिंपरी चिंचवड महापालिका.**

# एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या विवान पाटीलला 'ग्रेट आर्टिस्ट राजा रवि वर्मा पुरस्कार'

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलमधील इयत्ता पाचवीचा विद्यार्थी विवान पाटील याने चित्रकलेत राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करत 'ग्रेट आर्टिस्ट राजा रवि वर्मा पुरस्कार' पटकावला आहे. त्याला राष्ट्रीय स्तरावरील द्वितीय श्रेणीतील हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.**




पुण्यातील 'कलादर्पण' संस्थेच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांच्या चित्रकलेला प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी विविध गटांमध्ये राष्ट्रीय चित्रकला स्पर्धा आयोजित केली जाते. यंदाच्या चौथ्या राष्ट्रीय कलादर्पण चित्रकला स्पर्धेत देशभरातून आलेल्या विद्यार्थ्यांच्या चित्रांपैकी एकूण २२ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. त्यामध्ये ११ विद्यार्थ्यांना प्रथम श्रेणी, तर ११ विद्यार्थ्यांना द्वितीय श्रेणीचे पारितोषिक देण्यात आले.

प्रथम श्रेणीतील विद्यार्थ्यांना 'ग्रेट आर्टिस्ट राजा रवि वर्मा पुरस्कार', स्मृतिचिन्ह आणि मोबाईल भेट देण्यात आला, तर द्वितीय श्रेणीतील विद्यार्थ्यांना 'ग्रेट आर्टिस्ट राजा रवि वर्मा पुरस्कार', स्मृतिचिन्ह आणि सायकल प्रदान करण्यात आली. हा मान मिळवणारा विवान पाटील हा एस. बी. पाटील पब्लिक स्कूलचा पहिलाच विद्यार्थी ठरला आहे. विवानला चित्रकला शिक्षक कुलदीप घाडगे यांचे मार्गदर्शन लाभले.

### गुणवंत विद्यार्थ्याचे अभिनंदन

या यशाबद्दल पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, शाळेच्या प्राचार्या डॉ. बिंदू सैनी, उपप्राचार्या पद्मावती बंडा आणि मुख्याध्यापिका शुभांगी कुलकर्णी यांनी विवानचे अभिनंदन करून त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.


व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवड
प्रज्वलितो ज्ञानमयो प्रदीपः
|| न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ||
एस. एस. सी.
निकाल २०२६
एकूण निकाल
100%
प्रथम क्रमांक 1 कस्तुरी स्वानंद कुलकर्णी ९९%
द्वितीय क्रमांक 2 कस्तुरी दिपक गायकवाड ९७.२०%
तृतीय क्रमांक 3 वरदा रविराज टिकोळे ९७%
चतुर्थ क्रमांक 4 अनुष्का शाम शिंदे ९६.४०%
पाचवा क्रमांक 5 शिवहरी प्रशांत अतवाड ९५.२०%
९०% पेक्षा जास्त गुण मिळविणारे विद्यार्थी संख्या : २३
सर्व विद्यार्थी, पालक व शिक्षकांचे
हार्दिक अभिनंदन!
आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी
मनःपूर्वक शुभेच्छा!